पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.स्थायी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २९

**(सभावृत्तांत)**

दिनांक – ०४/१०/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०४/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.राजू मिसाळ
१४) मा.अमित राजेंद्र गावडे
१५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय–आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोराटे, मा.खोत, मा.राऊत, मा.दांगट-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.इंगळे, मा.तांबे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.कांबळे, मा.गट्टूवार-कार्य.अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**----------**

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक २४) | मा.स्थायी समिती सभा दि.१०/१०/२०१७ रोजी आयोजित करणेबाबत- मा.राजू मिसाळ, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक २५) | मौजे च-होली व मौजे डूडूळगांव येथी मंजूर विकास योजनेतील रस्ते/आरक्षण विकसित करणेसाठी भूसंपादन करणेबाबत... |
| विषय क्रमांक २६) | मौजे चोविसावाडी व वडमुखवाडी येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते विकसित करणेसाठी भूसंपादन करणेबाबत. |
| विषय क्रमांक २७) | मौजे बोपखेल येथील प्रस्तावित १) आ.क्र.२/१६९ प्राथमिक शाळा व २) आ.क्र. २/१५२ उद्यान व त्यासमोरील १८.० मी.रस्ता या आरक्षणाकरिता खाजगी जमिनीचे भुसंपादन करणेबाबत... |
| विषय क्रमांक २८) | महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा-२०१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत... |
| विषय क्रमांक २९) | मनपा वर्धापनानिमित्त थेट पध्दतीने करावयाच्या खर्चासाठी आगाऊ र.रू. ७,७५,०००/- खर्चास मंजूरी मिळणेबाबत... |
| विषय क्रमांक ३०) | ग क्षेत्रीय कार्यालयास नागरी सुविधा केंद्र सुरू करणेबाबत-मा.कैलास बारणे, मा. निर्मला कुटे यांचा प्रस्ताव. |
| विषय क्रमांक ३१) | पिंपरी चिंचवड महापालिकेमधील स्थापत्य व इतरकामांकरिता एन.ए.बी.एल. (NABL) मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून बांधकाम साहित्य तपासणी करून घेणेबाबत –मा.उत्तम केंदळे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव. |
| विषय क्रमांक ३२) | आर्किटेक्टची नेमणूक करणेबाबत-मा.हर्षल ढोरे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३३) | कै.शंकर हुसेन लोखंडे (घंडागाडी कर्मचारी) यांचेबाबत-मा.उषा मुंढे,मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ३४) | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ,ब,क,ड,इ व फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईकामी खाजगीकरणाद्वारे कामगार उपलब्ध करणेकामी निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ चे बाबतीत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या दाव्याबाबत. |

------------------

अ) दिनांक १३/०९/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १९/०९/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २७) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक –१०८१ विषय क्रमांक – १
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – कायदा
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/६/कावि/५३७/२०१७ दि.२५/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.जिल्हा न्यायालय शिवाजीनगर कोर्ट पुणे येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावे असलेल्या सी बिल्डिंग मधील चेंबर नं.५२ चा सन २०१७-२०१८ या वर्षाचा देखभाल खर्च रक्कम रु.१०,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०८२ विषय क्रमांक – २
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– कर आकारणी व कर संकलन
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/३/कावि/५४०/२०१७ दि.२५/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अभय योजनेअंतर्गत जनजागृती मोहिम राबविणेकामी विविध भारती (101FM) या रेडीओ स्टेशनवरून एकूण 15 दिवस थेट पद्धतीने करारनामा न करता मिळकतकर सवलत योजनेची माहिती प्रसिद्ध करणेकामी येणा-या अंदाजे र.रु.1,87,540/- (अक्षरी र.रू.एक लाख सत्याऐंशी हजार पाचशे चाळीस फक्त) किंवा प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०८३ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५३३/१७ दि.२२/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/२४/२०१७-१८ प्रभाग क्र.१४ मध्ये पेव्हींग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी **M/s.SANSARA CONSTRUCTION** नि.र.रु.१९,६०,७८५/- (अक्षरी र.रू.एकोणीस लाख साठ हजार सातशे पंच्याऐंशी फक्त) पेक्षा २१.२५% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१५,४४,११८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करून आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०८४ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५३४/१७ दि.२२/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०/३३/२०१७-१८ प्रभाग क्र.२५ मध्ये पेव्हींग ब्लॉक,पावसाळी गटर्स इ. स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी **M/s. VAISHNAVI ENTERPRISES** नि.र.रू.१९,६०,७७९/- (अक्षरी र.रू.एकोणीस लाख साठ हजार सातशे एकोणऐंशी फक्त) पेक्षा १६.०९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,४५,२९०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०८५ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१५१/२०१७ दि.२२/०९/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.११.०९.२०१७ ते दि.१७.०९.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१५१/२०१७ दि.२२.०९.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०८६ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– क्रीडा
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/१७४/२०१७ दि.१३/०९/२०१७
२) मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५६ दिनांक २२/०९/२०१७ नुसार,

कु.संजना विवेक फाळके हिची दिनांक २१/११/२०१७ ते दि.२५/११/२०१७ रोजी झालेल्या द्वितीय एशियन रोलबॉल चॅम्पियनशीप २०१६ बँकॉक, थायलंड करीता निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहून झालेला खर्च र.रु.७५,०००/- च्या ७५% र.रु.५६,२५०/- (अक्षरी र.रु.छप्पन्न हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०८७ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– क्रीडा

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/२०२/२०१७ दि.१४/०९/२०१७

२) मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५७ दिनांक २२/०९/२०१७ नुसार,

कु.श्रेया शंकर कंधारे, निगडी, पुणे ४४ हिने ७ वी एशियन योगा स्पोर्टस् चॅम्पियनशीप २०१७ सिंगापूर या स्पर्धेस जाऊन आल्याने तिने या कामी स्पर्धा खर्च योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेस र.रु.७०,०००/- स्वत: दिल्याने मनपा नियमानुसार र.रु.७०,०००/- च्या ७५% र.रु.५२,५००/- (अक्षरी र.रु.बावन्न हजार पाचशे फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१०८८ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– क्रीडा

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.कोमल मेवाणी

संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/१०१५/२०१७ दि.२२/०९/२०१७

२) मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५८ दिनांक २२/०९/२०१७ नुसार,

पिंपरी चिंचवड मनपा ३५ वा वर्धापनदिन २०१७ अनुषंगाने स्पर्धेतील विजेत्या/उप विजेत्या खेळाडूंना बक्षीस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, मानचिन्हे, कॅप, खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धा प्रसंगी अधिकारी, पाहुणे, कर्मचारी यांना चहापान व अल्पोपहार, क्रीकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन, क्रीकेट स्पर्धेत सहभागी (महिला व पुरुष) खेळाडूंसाठी ट्रॅक पँट, टी शर्ट, बॉल खरेदी इ.कामी प्रस्तावात नमुद प्रमाणे र.रु.५,५५,५५०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व स्पर्धेतील विजेत्या/उप विजेत्या खेळाडूंना बक्षीस स्वरुपात द्यावयाचे स्वेट शर्ट, टी शर्ट, शॉर्ट, ट्रॉफीज, मानचिन्हे, कॅप, खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, क्रीडा साहित्य खरेदी, क्रीकेट स्पर्धेत सहभागी (महिला व पुरुष) खेळाडूंसाठी ट्रॅक पँट, टी शर्ट, बॉल इ.ची खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदरचा खर्च "क्रीडा निधी, मनपातर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य खरेदी" या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>निर्णय</u>- <u>कच-याबाबत व पाणीपुरवठयाबाबत-</u>

१) सन्मा.सदस्यांच्या पाणीपुरवठयाबाबत तक्रारी आहेत. लोकांचे सकाळीच आम्हांला फोन येत असतात. पाणी सोडणारी जी यंत्रणा आहे ती आपण बदलली पाहीजे, दुर्दैवाने तेच लोक टेंडरमध्ये आहेत आणि तेच ईलीजीबल ठरले त्यामुळे आता परत त्याच सगळया प्रॉब्लेम्सला आम्ही फेस

करतो. पाणीपुरवठयामध्ये अनियमीतता आहे. जे काही प्रॉब्लेम आहेत ते ताबडतोब शोधावेत व नागरीकांना स्वच्छ व नियमीत पुरेशा प्रेशरने पाणी दयावे.

२) शंभर फ्लॅटची दोनशे फ्लॅटची सोसायटी तयार झाली की तुम्ही काय करता पाणी तेवढच उचलता परंतु इकडच कपात केल की तीकड दयायच तीकडच कपात केल की ईकड दयायच हा जो खेळ चालू आहे त्याच्यावर तुम्हांला कुठेतरी बंधन आणावे लागणार आहेत. याच्यावर सिरीएसली तुम्हांला विचार करावा लागणार आहे. कारण च-होली, मोशी, डूडूळगाव, चिखली या भागामध्ये सर्वात जास्त डेव्हलपींग ऐरीया आता तो आहे. ती गाव १९९७ पासून आपल्याकडे आलेली आता कुठेतरी वीस वर्षामध्ये त्या भागामध्ये डेव्हलपमेंट होते आहे. तेथील डेव्हलपमेंट थांबवायची म्हणलतर तो त्या गावावरती अन्याय आहे. पाण्याचा कमर्शिअल वापर प्रचंड मोठया प्रमाणात आहे. पाण्याची चोरी मोठया प्रमाणात आहे, गळती आहे. आम्ही मागच्या वेळेस तुम्हांला सांगीतलेल होत की स्लममध्ये सुध्दा तुम्ही पाण्याच बील लावा. तुम्ही टाईमींग दया. सकाळी दोन तास संध्याकाळी दोन तास. जिथ बील भरतात तिथ एकदाच पाणी आहे आणि जिथ बील भरत नाहीत तिथं दोन वेळा पाणी येतं, चोवीस तास पाणी आहे. हे कोणीही आपल्या अंगावर घेत नाही म्हणून आपण कामही करत नाहीत. तुम्ही जर असे गप्प बसलेतर हे प्रश्न भेडसावतच राहणार आहेत. याठिकाणी सगळे लोक टॅक्सपिअर आहेत सगळयांनाच समान पाणी वाटप करणे हे तुमच काम आहे. जो पैसे भरतो त्याला पाणी देत नाहीत आणि जो फुकट घेतो त्याला पाईप लावून तुम्ही देता. प्रत्येकवेळेस यावरच मिटींग होते. विकास कामाचे बाजूला राहते आणि आम्ही येथे आलो की कच-यावर नाहीतर पाण्यावर बोलावे लागते. दुसरा विषयच राहीला नाही.

३) श्री.खोराटे साहेब दोन प्रभाग नवीन झालेले आहेत दोन प्रभागाना नवीन टेंडर फ्लोट करावे. मे.कोर्टाने तुम्हांला त्याच्यावर सांगीतल का, आता जे टेंडर फ्लोट केले होते त्यामध्ये त्यांना सामावून घ्यायला सांगीतल. नवीन ग आणि ह प्रभागासाठीचे टेंडर रद्द झालेले नाही.

४) कचरा वाहतूकीसाठीच्या गाडया कमी असतीलतर त्या भाडे तत्वावर घेण्यासाठी प्रभाग अधिका-यांना अधिकार आहेत त्या का घेतल्या नाहीत आणि पुरेशा गाडया असतील, कर्मचारी असतीलतर नियोजनाचा अभाव आहे. एवढया गाडया असून सुध्दा कच-याच्या तक्रारी कशा काय येतात. कचरा का उचलला जात नाही. ठेकेदार आणि कर्मचा-यांच्याकडून काम करुन घेणे आवश्यक आहे.

५) जे कामचुकार अधिकारी/कर्मचारी असतील त्यांच्यावर कार्यवाही करावी.

६) क प्रभागातील कच-याच्या संदर्भात मा.राहूल जाधव यांची तक्रार कायम आहे. त्याबाबतीत तातडीने कार्यवाही करावी.

७) ड प्रभागातील वॉर्डातील कच-याचे मोठे फोटो पेपरला आलेले आहेत, वर्तमानपत्रामध्ये अस्वच्छतेबाबत प्रसिध्द होणा-या बातम्याकडे आपण लक्ष दिले पाहीजे.

८) गवत कटिंगच्या मशिन घेणेबाबत स्थायी समितीला ठराव झालेला आहे त्यावर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

९) ओपन जीमच्या संदर्भात अंमलबजावणी झाली का.

१०) श्री.पोमण साहेब, टेंडर भरण्याची २७ तारीख शेवटची तारीख होती त्या दिवशी आपल्याकडे सर्व्हर डावून झाला होता, चौथ्या मजल्यावर माहिती व तंत्रज्ञान विभागात लोकांनी गर्दी केली होती तुम्ही त्यांना ॲक्सपेक्ट केल नाही. दोन चार लोकांना ॲक्सपेक्ट केलं. म्हणून आपण मुदतवाढ करा म्हणून सांगीतल होतं ते झाल का ते पहावे.

११) प्रभागामधील टेंडर ओपन केले आहेत का. नसतील झालेतर का झाले नाहीत ते पहावे.

१२) कचरा आणि पाण्याच्या संदर्भात सगळयांनी काळजी घ्यावी.

१३) श्री.कडूस्कर साहेब, स्थायी समितीमध्ये व्यायाम शाळेचे, क्रिडांगणाचे जे जे ठराव झालेले असतील त्याच्यावर अंमलबजावणी का केलेली नाही याची माहिती द्यावी.

-------------

ठराव क्रमांक –१०८९ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– क्रीडा

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.कोमल मेवाणी

संदर्भः- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/३६९/२०१७ दि.२२/०९/२०१७

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५९

दिनांक २२/०९/२०१७ नुसार,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पुणे जिल्हा रोलबॉल असोशिएशन यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने माहे ऑक्टो./नोव्हें. २०१७ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटींग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.५,००,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च रक्कम रु.५,००,०००/- मधील स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था खर्च एकूण र.रु.७४,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग, संबंधीत क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.३,८६,०००/- हा क्रीडा विभागाचे “महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा” या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९० विषय क्रमांक – १०

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– क्रीडा

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भः- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/१०१४/२०१७ दि.२२/०९/२०१७

२)मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ६० दिनांक २२/०९/२०१७ नुसार,

मा.जिल्हा क्रीडा अधिकारी,पुणे यांचे पत्र क्र.जि.क्री.अ./शा.क्री.स्प./सुफट/मैदान मागणी /२०१७-१८/का-४ दि.२९ जुलै २०१७ च्या पत्रानुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, शासकीय जिल्हास्तर शालेय रोलबॉल, डॉजबॉल व सिकई मार्शल आर्ट या ३ स्पर्धा आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहा अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी खर्च, फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन पद्धतीने करणे, पाहुणे सत्कारार्थ

बुके खरेदी, आयोजनाचा खर्च र.रु.३५,२००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१७-१८ अनुषंगाने येणारा खर्च हा क्रीडा निधी - वार्षिक स्पर्धा क्रीडा कला तरतूद र.रु.२०,००,०००/- या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस तसेच जिल्हास्तर शालेय रोलबॉल, डॉजबॉल व सिकई मार्शल आर्ट २०१७-१८ अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९१ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– क्रीडा
सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- १) मा.भिमाबाई फुगे,मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ६२ दिनांक २२/०९/२०१७ नुसार,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.धोंडिबा गणपत फुगे मैदान, दिघीरोड, प्रभाग क्र.०७ मध्ये विरंगुळा केंद्र व्यायामशाळा, संपुर्ण क्रीडांगण “सह्याद्री स्पोर्टस् फौंडेशन” या संस्थेला ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर संपुर्ण क्रीडांगण, व्यायामशाळा, विरंगुळा केंद्र चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.धोंडिबा गणपत फुगे मैदान, दिघी रोड, प्रभाग क्र. ०७ मध्ये विरंगुळा केंद्र व्यायामशाळा संपुर्ण क्रीडांगण “सह्याद्री स्पोर्टस् फौंडेशन” या संस्थेला ११ महिने कराराने दरमहा र.रू.३०,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९२ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– इ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.इक्षेका/वि/६३६/१७ दि.२६/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा सार्वत्रिक निवडणुक २०१७ साठी आवश्यक मतदान यंत्राचे EVM Randmization व Preparation चे कामकाजासाठी दि.१३-०२-२०१७ रोजी १०X१२ फुट आकाराच्या एक नग एल.ई.डी. स्क्रीनची व दि.१४-०२-२०१७ ते दि.१६-०२-२०१७ या तीन दिवशी १०X८ फुट आकाराच्या एकुण ११ नग एल.ई.डी. स्क्रीनची व्यवस्था, स्पिकर, माईक व्यवस्था करणे याकामी वापरात आलेल्या बाबींचे अंदाजपत्रक तयार केले असता त्यानुसार र.रु.७,२४,९००/- इतका खर्च झाला आहे. सदर काम मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर अन्ड इल्क्ट्रीकल्स, निगडी यांजकडुन सध्याचे चालु/पुर्ण निविदा स्विकृत दराने (नि.क्र.३/३२-१६/१७, ०.९% कमी) करारनामा न करता थेट पद्धतीने करुन

घेणेस कार्योत्तर मान्यता देणेस व याकामी झालेल्या खर्चाची अदायगी मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर अन्ड इलेक्ट्रीकल्स, निगडी यास रक्कम रुपये ७,१८,३७६/- (अक्षरी र.रु.सात लाख अठरा हजार तीनशे शहात्तर फक्त) करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०९३ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– ब क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षेका/स्था/कावि/१६/२०१७ दि.२५/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

वॉर्ड क्र.५० प्रसूनधाम जवळील थेरगाव ते चिंचवडगाव या नियोजित १८ मीटर डी.पी. रस्त्यातील पवना नदीवर पूल बांधणे कामी या पूर्वी नेमणूक करणेत आलेले प्रकल्प सल्लागार मे.एस.एन.भोबे ॲण्ड असोसिएट्स प्रा.लि. यांची नेमणूक रद्द करून त्यांचे जागेवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट) म्हणुन मे.श्रीखंडे कन्सलटन्ट प्रा.लि. यांची सदर प्रकारच्या कामांचा पुर्वानुभव लक्षात घेता त्यांची फक्त निविदा पश्चात कामासाठी नेमणूक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना याकरीता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदा पश्चात कामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या १.३५% अधिक शासनकर इतकी फी अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०९४ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य विभाग

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२५४/१७ दि.२७/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/१३/१७-१८ अन्वये भोसरी प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील भागात गटर्सची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.के.पी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३३,१९०/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख तेहतीस हजार एकशे नव्वद फक्त) पेक्षा १८.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,९०,११७/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९५ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य विभाग
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३इ/कावि/२५३/१७ दि.२७/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील नि.नो.क्र.८/२/१७-१८ भोसरी प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मधील आळंदी रोड, दिघीरोड परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.के.पी. कन्स्ट्रक्शन नि.र.रु.२३,३३,१९०/- (अक्षरी र.रु.तेवीस लाख तेहतीस हजार एकशे नव्वद फक्त) पेक्षा १८.९९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,९०,११७/- पर्यंत काम करुन घेणेस कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९६ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– शिक्षण मंडळ
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.शिमं/९/कावि/१६०/२०१७ दि.२५/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा बालवाडी, शासकीय अंगणवाडी व मनपा प्राथमिक शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना खाऊ म्हणून बिस्कीटे पुरविणेबाबत दर मागविणेकामी निविदा नोटीस क्र.1-2017-18 अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर निविदेची मुदत दिनांक 27/7/2017 ते 02/8/2017 अखेर होती. प्रथम तांत्रिक लिफापा 03/8/2017 रोजी उघडण्यात आलेला आहे. दराचे पाकिट दिनांक-07/8/2017 रोजी उघडण्यात आलेले आहे. निविदा नोटीसीस अनुसरून मे. आर.आर. एन्टरप्रायजेस यांचे दरपत्रकान्वये ब्रिटानिया कंपनीचे टायगर ग्लुकोज बिस्कीट पुडे शाळावार पुरवठा करणेकामी लघुत्तम दर र.रू.६.३५ प्रती पुडा दराने मे. आर.आर. एन्टरप्रायजेस यांचेशी करारनामा करणेत आलेला असून दिनांक-15 ऑागस्ट 2017 व 26 जानेवारी 2018 या राष्ट्रीय सणांचे दिवशी मनपा बालवाडी, शासकीय अंगणवाडी, व मनपा प्राथ. शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना खाऊ म्हणून प्रत्येकी 1 ग्लुकोज बिस्कीट पुडा पुरविणेबाबतच्या प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९७ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– माहिती व तंत्रज्ञान विभाग
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१४/कावि/१४२/१७ दि.२६/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दि.२२ ऑगस्ट २०१७ रोजी माहिती व तंत्रज्ञान दिवसाचे औचित्य साधून सारथी हेल्पलाईन प्रणाली संदर्भात आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी आगाऊ घेतलेली

र.रू.६०,०००/- मधून झालेला खर्च र.रू.४८,७४०/-साठी मान्यता देवून अगाऊ रकमेचे समायोजन करणेस तसेच उपस्थितांना देण्यात आलेल्या वस्तू कोटेशन न मागविता बाजारातून थेट पद्धतीने खरेदी केलेल्या साहित्याचे बील र.रू.४०,९९८/-मे.इंदू इन्फोटेक सोल्युशन यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९८ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५४५/१७ दि.२८/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र १०/१५/२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र.१६ मध्ये वसंतदादा पाटील शाळाचे रंगरंगोटी व नुतनीकरणाची कामे करणेकामी **M/s.SIDDHI ENTERPRISES (S.H.Waghere)** नि.र.रू.२२,३७,०८६/- (अक्षरी र.रू.बावीस लाख सदोतिस हजार शहाऐंशी फक्त) पेक्षा १७.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१८,५४,५४४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०९९ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य अ मुख्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५४१/१७ दि.२८/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र १०/१३/२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र. १४ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी **M/s.SIDDHI ENTERPRISES** नि.र.रू.२१,००,८३०/- (अक्षरी र.रू.एकवीस लाख आठशे तीस फक्त) पेक्षा १७.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१७,४१,५८८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११००
विषय क्रमांक – २०
दिनांक – ०४/१०/२०१७
विभाग– स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.अमित गावडे
अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/५४३/१७ दि.२८/९/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र १०/७/२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र.२७ मध्ये पेव्हिंग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दरुस्तीची कामे करणेकामी **M/s.SHRIGURU CONSTRUCTION** नि.र.रु.१९,५९,६८८/- (अक्षरी र.रू.एकोणीस लाख एकोणसाठ हजार सहाशे अठ्याऐंशी फक्त) पेक्षा २०.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. १५,६५,७९१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार करारनामा करुन आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०१
विषय क्रमांक – २१
दिनांक – ०४/१०/२०१७
विभाग– नगरसचिव कार्यालय
सूचक – मा.अमित गावडे
अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/९८५/२०१७ दि.२९/०९/२०१७

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०२
विषय क्रमांक – २२
दिनांक – ०४/१०/२०१७
विभाग– नागरवस्ती विकास योजना
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.सहाय्यक आयुक्त यांचे जावक क्र.नाविया/०४/कावि/६९९/२०१७ दि.२८/०९/२०१७

मा.सहाय्यक आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकडील अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत घटक योजना क्रमांक ८ अंतर्गत २०१७-१८ या आर्थिक वर्षातील १०४ कुष्ठपिडीत निःसमर्थ (अपंग) व्यक्तींना दरमहा र.रू.२५००/- प्रमाणे सहामाही र.रू.१५,०००/- देणेस व त्याकामी येणारे र.रू.१५,६०,०००/-(अक्षरी र.रू.पंधरा लाख साठ हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच जाहीर प्रकटनाद्वारे नव्याने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्राप्त होणा-या अर्जापैकी पात्र लाभार्थींना व कागदपत्रांचे पुर्ततेनंतर पात्र होणा-या लाभार्थींना माहे एप्रिल २०१७ ते माहे मार्च २०१८ अखेर अर्थसहाय्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०३ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग– स्थापत्य-बीआरटीएस
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/६४७/२०१७ दि.२९/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकातील पान क्र.७३ अनु क्र.६० अन्वये पिंपरी चिंचवड संपुर्ण शहरासाठी उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (HCMTR) विकसीत करणेच्या कामास र.रू.३००,००,००,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस मा.महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तथापि सन २०१६-१७ मध्ये कामास तरतुद ठेवणेत आली नसल्यामुळे तसेच सन २०१७-१८ साठी फक्त र.रू.१,००,०००/- तरतुद ठेवणेत आली आहे. त्यामुळे सदर मौजे रहाटणी येथील कोकणे चौक ते काळेवाडी फाट्यापर्यंत उच्च क्षमता द्रुतगती मार्गामध्ये (HCMTR) रस्ता विकसीत करणेचे काम हे अंदाजपत्रकातील याच कामाचा एक भाग असल्यामुळे मौजे रहाटणी येथील कोकणे चौक ते काळेवाडी फाट्यापर्यंत उच्च क्षमता द्रुतगती मार्गामध्ये (HCMTR) रस्ता विकसित करणेकामी अंदाजपत्रकातील "HCMTR च्या राखीव जागा सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेसाठी DMRC च्या सल्ल्यानुसार BRT/मोनेरेल/ट्राम यासाठी विकसित करणे" या लेखाशिर्षावर "शहर विकास आराखडा" या लेखाशिर्षातील एकूण तरतूदी पैकी र.रू.९,००,००,०००/- तरतूद सन २०१७-१८ या वर्षासाठी उपलब्ध करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>

ठराव क्रमांक –११०४ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०४/१०/२०१७
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.राजू मिसाळ, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

दि.११/१०/२०१७ रोजी महापालिकेचा वर्धापन दिन असल्याने दि.११/१०/२०१७ ची मा.स्थायी समिती सा मंगळवार दि.१०/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०५ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/३६/३६३/२०१७ दि.०४/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे च-होली व मौजे डुडुळगाव येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते।आरक्षण विकसित करणेसाठी आवश्यक त्या ठिकाणी भूसंपादन करणेबाबत मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१६

दि.८।०८।२०१७ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.६५ दि.१९।०८।२०१७ अन्वये मा.सदस्य ठराव करणेत आलेले आहे.सदर ठरावांची अंमलबजावणी करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.सदर ठरावात खालील नमुदप्रमाणे रस्ते व आरक्षणांचा समावेश आहे.

१. मौजे च-होली येथील स.नं. २२७ ते स.नं. १९८ पर्यंत २४ मी. मंजूर विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे.
२. मौजे च-होली येथील स.नं.१९२ ते स.नं. ८७ पर्यंत १८ मी. मंजूर विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे.
३. मौजे च-होली, कोतवालवाडी स.नं. ४६१ ते डी.वाय पाटील शाळा च-होली हद्दी पर्यंत (स.नं. १३४) ३० मी. विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे.
४. मौजे च-होली येथील ताजणे मळा स.नं. ४३० च-होली गावापर्यंत १८ मी. विकास योजनेतील रस्ता भूसंपादन करणे.
५. मौजे च-होली येथील स.नं. १०१३ ते स्मशानभूमी पासुन जाणारा १८ मी. विकास योजनेतील रस्ता स.नं. ८ पर्यंत भूसंपादन करणे.
६. मौजे च-होली येथील स.नं. १०२७ ते १०१० पर्यंत ३० मी. व पुढे १२ मी. विकास योजनेतील रस्त्याचे भूसंपादन करणे.
७. मौजे च-होली येथील म्हसोबा मंदीर स.नं. ५१९ ते ४७५ कोतवालवाडी पर्यंत विकास योजनेतील ३० मी. रस्ता भूसंपादन करणे.
८. मौजे च-होली येथील हिरामाता मंदीर स.नं. ४३ ते स.नं. १०९ पर्यंत विकास योजनेतील ३० मी. रस्ता भूसंपादन करणे.
९. मौजे च-होली येथील मंजूर विकास योजनेतील आ.क्र. २।६४ उद्यानाची जागा भूसंपादन करणे.
१०. मौजे डुडुळगाव येथील स.नं. १८९ पासून स.नं. १९१ पर्यंत २४ मी. रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहेत.
११. मौजे च-होली स.नं. १७७ पासुन बुर्डे वस्तीकडे जाणा-या १८ मी. विकास योजनेतील रस्त्याचे (स.नं. १७२, १७३, १७४, १७५,१७६,१७७) भूसंपादन करणेस मान्याता देणेत येत आहे.
१२. मौजे च-होली येथील म्हसोबा मंदीर ते इंद्रायणी नदीकडे जाणारा ४५ मी. रस्त्यासाठी स.नं. ५३५ (जुना स.नं. १००४) व स.नं. ५३६ (जुना स.नं. १००५) मधील क्षेत्राचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मौजे च-होली व मौजे डुडुळगाव येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते ।आरक्षण विकसित करणे सदर गावांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असुन त्यासाठी भूसंपादन करावे लागणार आहे. तसेच सदर रस्ते।आरक्षण मनपाच्या ताब्यात भुसंपादनाने घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्च व तदअनुषंगीक खर्चास (त्यामध्ये भूसंपादन विशेष अधिकारी कळवतील ती नुकसानभरपाई रक्कम अदा करणेस) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०६ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. नरवि/कावि/१६/७५५/२०१७ दि.०४/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे चोविसावाडी व वडमुखवाडी येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते विकसित करणेसाठी आवश्यक त्या ठिकाणी भूसंपादन करणेबाबत मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. १५ दि. ८।०८।२०१७ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.६४ दि.१९।०८।२०१७ अन्वये मा.सदस्य ठराव करणेत आलेले आहे. सदर ठरावांची अंमलबजावणी करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.सदर ठरावात खालील नमुदप्रमाणे रस्ते व आरक्षणांचा समावेश आहे.

१. मौजे चोविसावाडी येथील स.नं. १०२ ते ९२ पासुन स.नं. ९१ पर्यत चोविसावाडी हद्दीपर्यत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.
२. मौजे चोविसावाडी येथील स.नं. १८६ पासुन स.नं. १९५ चोविसावाडी हद्दीपर्यत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.
३. मौजे वडमुखवाडी येथील स.नं. २५ पासून ते स.नं. ५५ पर्यत वडमुखवाडी हद्दीपर्यत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.
४. मौजे वडमुखवाडी मधील स.नं. २१७ पासुन ते स.नं. १८८ पर्यत वडमुखवाडी हद्दीपर्यत मंजूर विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.
५. मौजे चोविसावाडी मधील स.नं. ३० पासून स.न. ३९ पर्यत मंजूर विकास योजनेतील २४ मी. व तेथुन पुढे स.नं. ३९ पर्यत विकास योजनेतील १८ मी. रस्ता भूसंपादन करणे.

मौजे चोविसावाडी व वडमुखवाडी येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते विकसित करणे सदर गावांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असुन त्यासाठी भूसंपादन करावे लागणार आहे. तसेच सदर रस्ते मनपाच्या ताब्यात भुसंपादनाने घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास (त्यामध्ये भूसंपादन विशेष अधिकारी कळवतील ती नुकसानभरपाई रक्कम) तसेच त्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण ,मोजणी करणे इ.अनुषंगिक मंजूरीसह येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०७ विषय क्रमांक – २७
दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. नरवि/कावि/१२/१६२/१७ दि.०४/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे बोपखेल येथील मंजूर विकास योजनेतील रस्ते।आरक्षण विकसित करणेसाठी आवश्यक त्याठिकाणी भूसंपादन करणेबाबत मा.महापालिका सभेचा ठराव क्र.६२ दि.१९/०८/२०१७ अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. सदर ठरावात खालील नमुदप्रमाणे रस्ते व आरक्षणांचा समावेश आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | आरक्षण क्र. २/१६९ | प्राथमिक शाळा | १५२ पैकी | ४०००.०० चौ.मी. |
| २. | आरक्षण क्र. २/१५२ | उद्यान | १५६ पैकी | उद्यान – ५०००.० चौ.मी. |
| ३ | १८.० मी. रस्ता उद्यानालगतचा पुर्व-पश्चिम रस्ता | -- | १५६ पैकी | अंदाजे ३६०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणांखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता व प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणेत आलेली आहे. सदर रस्ते।आरक्षण मनपाच्या ताब्यात भुसंपादनाने घेणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास (त्यामध्ये भूसंपादन विशेष अधिकारी कळवतील ती नुकसानभरपाई रक्कम) तसेच त्यासाठी आवश्यक ते सर्वेक्षण, मोजणी करणे इ. अनुषंगिक येणा-या सर्व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०८ विषय क्रमांक – २८

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – क्रीडा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/१०३८/२०१७ दि.४/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने इंडियन स्टाईल व्रेस्टलिंग असोसिएशन ऑफ इंडिया महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद पुणे व पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कुस्तीगीर संघ चिंचवड यांच्या मान्यतेने व जय गणेश युवा फौंडेंशन, विनायकनगर, बो-हाडे वाडी, मोशी ता.हवेली, जि.पुणे- ४१२१०५ यांच्या सहकार्याने माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, नागेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, से.न.८ विनायकनगर बो-हाडेवाडी, मोशी पुणे ४१२१०५ येथे महापौर चषक आंतर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २०१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या स्थापत्य व विद्युत विषयक खर्च वगळता र.रु.६६,८९,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच स्पर्धा अनुंषगाने द्यावयाचे चांदीचे गदा, ट्राफीज, मानचिन्हे, फेटे, खरेदी पी.व्ही.सी. प्लेक्स बॅनर्स छपाई, कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११०९ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/९१/२०१७ दि.४/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ३५ वा वर्धापनदिन दि.११ ऑक्टोबर २०१७ रोजी संपन्न होत आहे. त्यानिमित्त दि.११/१०/२०१७ रोजी मनपा प्रशासकीय इमारत व प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांतर्गत शहर पातळीवर स्वच्छता अभियान, विविध क्रीडा निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, कार्यालय स्वच्छता स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, विविध स्पर्धेतील विजेत्यांकरिता बक्षीस वितरण, कवी संम्मेलन, न्यु होम मिनिस्टर खेळ पैठणीचा, नामांकित हास्य विनोदी कलाकारांचे मानधन तसेच कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्टेज बँनर, कमान बँनर, फ्लेक्स स्टेज सजावट सत्काराकामी विविध पुस्तके खरेदी, कार्यक्रमाचे उद्घाटन, सनई चौघडा वादन कार्यक्रमासाठी भेटवस्तू, स्मृतीचिन्हे, प्रेक्षागृह भाडे तसेच मान्यवर यांच्या चहापान व भोजन व्यवस्था इ.करीता थेट पध्दतीने अंदाजे र.रू.७,७५,०००/- इतका खर्च अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१११० विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०४/१०/२०१७

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.कैलास बारणे, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव -

थेरगांव मध्ये कुठेही नागरी सुविधा केंद्र अद्यावत नसले कारणाने येथील नागरिकांची फॉर्म भरण्यासाठी गैरसोय होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालयाची नव्याने स्थापना झाली असून त्याठिकाणी नागरी सुविधा केंद्र सुरू करणेत यावे. तसेच सदरचे नागरी सुविधा केंद्र आनंद पार्क मित्र मंडळ, आनंद पार्क कॉलनी, थेरगांव या नोंदणीकृत संस्थेस चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –११११ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०४/१०/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा. कैलास बारणे

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव -

पिपंरी चिंचवड महानगरपालिका मार्फत मोठया प्रमाणात रस्ते, पुल, इमारती, पाणी पुरवठा, ड्रेनेज, उदयान इ.ची कामे करण्यात येतात.यामध्ये मोठया प्रमाणात बांधकाम साहित्याचा वापर होतो.हे बांधकाम साहित्य मान्यता प्राप्त (एन.ए.बी.एल.) NABL सर्टीफाईड प्रयोग शाळेतून

करणे योग्य असताना.सदयास्थितीत असे करण्यात येत नाही. बरेच बांधकाम यामध्ये या साहित्याची गुणवत्ता हमी देणे शक्य होत नाही. सर्व NABL प्रयोगशाळांचे सरकारी यत्रेणेमार्फत ऑडीट होत असलेने NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतील रिपोर्ट यांची गुणवत्ता हामी असते. NABL सर्टीफिकेट हे क्वालीटी कॉन्सील ऑफ इंडीया यांचे अखत्यारीत असल्याने फक्त योग्य गुणवत्ता असलेल्या प्रयोगशाळांना हे सर्टीफिकेट देण्यात येते. यापुढे सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे कामामध्ये सर्व बांधकाम साहित्य हे NABL अक्रीडेशन असलेल्या गुणवत्तापुर्व प्रयोग शाळेमधुनच करणे बंधनकारक राहील. अशा प्रकारच्या ५ ते ६ प्रयोगशाळा उपलब्ध असलेने मनपाचे कामाची गुणवत्ता राखणे शक्य होईल. सर्व खात्यामधील स्थापत्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज, उदयान इ. मध्ये बांधकाम साहित्य हे NABL अक्रीडीटेड लॅबमधून तपासणी करुन ठेकेदाराचे बील अदा करणे बंधनकारक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १११२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०४/१०/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.हर्षल ढोरे, मा. कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव-

पिंपरी येथील स.नं.३१/१ ते ५८३२/१ व २ ते ६ मधील जागा क्षेत्र सुमारे १७९१.३५ चौ.मी. जागेमध्ये अंध-अपंगासाठी सांस्कृतिक केंद्र बांधणेचे कामासाठी मे. अजित साळवे अँड असोसिएटस यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणे व मनपा आयुक्त हे ठरवतील त्या मनपाचे प्रचलित दराने त्यांना फी आणि त्यावरील जी.एस.टी.सह अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १११३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०४/१०/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.उषा मुंढे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव -

दि.१५/०९/२०१६ रोजी गणपती विसर्जनाच्या दिवशी घंटागाडी कर्मचारी सेवेत असताना व महानगरपालिकेच्या कायम सेवेत असलेल्या आरोग्य कर्मचा-यास वाचवित असताना कै.शंकर हुसेन लोखंडे या घटागाडी कर्मचा-याचे निधन झाले आहे. त्यास १ वर्ष कालावधी होऊन गेला आहे. सदर घंटागाडी कर्मचा-याची कुटुंबाची परिस्थिती हालाखीची असुन, सदर कुटुंबास आधार देण्याची आवश्यकता आहे. तरी सदर कर्मचा-यांच्या कुटुंबाला महानगरपालिकेतर्फे अर्थसहाय्य देण्यास किंवा त्यांच्या वारसांना महापालिकेत नोकरी देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १११४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०४/१०/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/६४१/२०१७ दि.०४/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अ, ब, क, ड, इ व फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाई कामी खाजगीकरणाव्दारे कामगार उपलब्ध करणेकामी ई-निविदा नोटिस क्रमांक ३-१ ते ३-६/२०१७-१८ या कामाच्या १ वर्ष कालावधीसाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यास पिंपरी–चिंचवड शहर स्वंयरोजगार संस्थाचे फेडरेशन यांनी तसेच श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांनी अनुक्रमे क्रं. ८८४९/२०१७ व क्रं.६८४४/२०१७ अन्वये याचिका दाखल केलेल्या आहेत. सदर प्रकरणात दिनांक २९/०९/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने निर्देशीत केल्यानुसार सदरचा आदेश अवलोकन करणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ ,ब ,क ,ड ,इ व फ क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते / गटर्स साफसफाई कामी खाजगीकरणाद्वारे कामगार उपलब्ध करणेकामी निविदा नोटीस क्र.३ / २०१७-१८ चे बाबतीत मा.उच्च न्यायालय ,मुंबई येथे दाखल केलेल्या दाव्याबाबत मा.स्थायी समिती सभेसमोर विषय सादर करणेत आलेला आहे.

प्रस्तुत विषयासंदर्भात खालील बाबी मा.उच्च न्यायालयास तपशिलवार व आकडेवारीसह निदर्शनास आणून देणेस मान्यता देणेत येत आहे.

अ) कामगार कल्याण विभागामार्फत नियुक्त त्रिमुर्ती कन्सल्टन्सी यांचेकडून अ, ब, क, ड, इ व फ क्षेत्रिय कार्यालयाकडील ६८ संस्थांच्या कामगारांचे एप्रिल २०१५ ते मार्च २०१७ या कालावधीमधील मुळ वेतन पत्रक, हजेरी पत्रक, पीएफ चे अंशदान तसेच पीएफ चलन इ. कागदपत्रांची तपासणी केली असता, खालील प्रमाणे संस्थांची अनियमीतता निदर्शनास आली आहे.

१) भविष्य निर्वाह निधी न भरलेल्या संस्थांची संख्या – ०२
२) २ महिन्यांचा भविष्य निर्वाह निधी न भरलेल्या संस्थांची संख्या – ०१
३) १ ते २ वर्षे उशिराने व एकदम भविष्य निर्वाह निधी भरलेल्या संस्थांची संख्या -१२
४) ६ महिने ते १ वर्ष उशीराने भविष्य निर्वाह निधी भरलेल्या संस्थांची संख्या – १५
५) ३ ते ६ महिने उशीराने भविष्य निर्वाह निधी भरलेल्या संस्थांची संख्या – १५
६) १ ते ३ महिने उशीराने भविष्य निर्वाह निधी भरलेल्या संस्थांची संख्या – २२
७) विहीत मुदतीत भविष्य निर्वाह निधी भरलेल्या संस्थांची संख्या – ००

प्राप्त अहवालानुसार एकूण संस्थापैकी १५ संस्था या मोठया प्रमाणात दोषी असून, इतर सर्व संस्थांनी भविष्य निर्वाह निधीची रक्कम विहीत मुदतीत भरलेली नाही. त्यामुळे त्यांचेवर भविष्य निर्वाह निधी कार्यालयामार्फत दंड व व्याज आकारले जाते. त्यामुळे या संस्थांही प्रथम दर्शनी दोषी असल्याचे दिसून येते, असे दिनांक ४/१०/२०१७ चे पत्रान्वये कळविले आहे.

ब) ई क्षेत्रिय कार्यालयामार्फत देव स्वंयरोजगार सह .संस्था मर्या .या संस्थेवर कामगारांचे पी.एफ . व इएसआय रक्कम महापालिकेकडून अदा करुनही संबंधीत खात्याकडे /शासनाकडे जमा न करता स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वापरले, या कारणास्तव दि .१४/०७/२०१७ रोजी भोसरी पोलिस स्टेशन येथे एफ .आय .आर .क्रं .३०६/२०१७ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

क)  जिजाऊमाता स्वंयरोजगार सेवा सह संस्था) अ क्षेत्रिय कार्यालय( या संस्थेस करारनाम्याच्या अटी नुसार मध्येच काम बंद केल्याने क्रं .आमुका/४/कावि/६७५/२०१६ ,दि .१६/११/२०१६ अन्वये व देव स्वंयरोजगार सेवा सह .संस्था मर्या) .इ क्षेत्रिय कार्यालय (या संस्थेस क्रं .आमुका/४/कावि / ४९५/२०१७ दि.४/८/२०१७ अन्वये तसेच श्री.व्यंकटेश्वरा बेरोजगार सेवाभावी संस्था) अ क्षेत्रिय कार्यालय( या संस्थेस कामकाजाचा कालावधी पुर्ण न करता कामगारांना वेतन न देणे ,कामगारांची ई.एस.आय ,.पी.एफ.ची रक्कम त्यांच्या खात्यात जमा न करणे या कारणांसाठी क्रं . आमुका/४/कावि/४९४/२०१७ दि .४/८/२०१७ अन्वये काळया यादीत टाकणेत आलेली आहे .

ड)  नविन निविदा नोटीस क्रं .३)२/(२०१७-१८ या निविदेतील टर्नओव्हर र.रु .निविदा रक्कमेच्या ३० टक्के सरासरी म्हणजे र.रु .८४,७६,४०८ -/इतकी असणे आवश्यक आहे .त्यानुसार अर्जुन आधार महिला स्वंयरोजगार सेवा सह .संस्था मर्या. या संस्थेने निविदेसाठी सादर कागदपत्रांनुसार मागील ३ वर्षाची सरासरी र.रु. १.४४ कोटी व राजमाता अहिल्यादेवी होळकर स्वंयरोजगार सेवा सह .संस्था मर्या .या संस्थेने निविदेसाठी सादर केलेल्या कागदपत्रानुसार मागील ३ वर्षाची सरासरी र.रु .१.०४ कोटीची पुर्तता केल्याने तांत्रिक तपासणीकामी त्यांना निविदेसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

इ)  रस्ते व गटर्स साफसफाई साठी कार्यरत असणा-या ६८ संस्थांनी आरोग्य विभागाकडे ई -नोंदणी/रजिस्ट्रेशन करते वेळी सादर केलेल्या यादीतील एकूण ७५९ सभासदापैंकी हजेरी मस्टरनुसार १५ संस्थांचे फक्त १९ सभासदच कामगार म्हणून काम करीत आहेत .

ई)  पी.एफ.बाबत महानगरपालिकेने सदर संस्थांना नोटीस दिल्यानंतर एक गठ्याने पी.एफ. संबंधित कामगारांच्या नावे जमा केलेचे निदर्शनास आलेले आहे.

फ)  पी.एफ. व इ.एस.आय. बाबत महानगरपालिकेच्या २ ते ३ मा.स्थायी समिती सभेमध्ये ही चर्चा करण्यात आलेली आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>निर्णय-</u> <u>स्वच्छतेच्या संस्थेबाबत</u> –**

**१)** आपल्याला टेंडर रद्द करुन नवीन टेंडर करायला मा.कोर्टाने सांगीतलेले आहे. नवीन टेंडरमध्ये त्यांना सहभागी करुन घ्यायला सांगीतलेले आहे. पण त्यामध्ये आपण एक ठेवल की जी कुठली संस्था असेल त्यांनी किमान दोन महीने, तीन महीन्याचा पेमंट त्या कर्मचा-यांचा करता आला पाहीजे म्हणून आपण त्यामध्ये फायनान्शिअल अट टाकली होती. त्यांना एकत्रीत येवून टेंडर भरण्यासाठी मनाई केलेली नव्हती. त्यांनी ते केलेल नाही.

**<u>निर्णय</u>- <u>बोनसबाबत-</u>**

१) शाळेतील ज्या मदतनीस आहेत त्यांना आपण दोन हजार रुपये देतो. एकतर आपण त्यांना मिनीमम वेजेसप्रमाणे पगार करत नाहीत. दोन हजार रुपये आपण ते पण मुख्याध्यापकांना देतो व मुख्याध्यापक ते परस्पर त्यांच्या सोईनुसार त्यांना देतात. त्यामध्येही महीन्यातील चार सुट्टया कपात होतात आणि १२०० ते १३०० रु. त्यांना आपण देतो. त्यांच्यासाठी जसं घंटागाडी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान मंजूर केले होते तसं त्या मदतनीस ७० लोकांना सुध्दा आपण दिवाळीसाठी सानुग्रह अनुदान दयावे असा ठराव केलेला होता. त्या ठरावाची ताबडतोब अंमलबजावणी करावी.

२) एकतर त्यांना तुम्ही वेळेत काढले नाही, आता ते सुध्दा हायकोर्टात आहेत. त्यांनाही बेरोजगार करुन चालणार नाही. आता नवीन ज्या संस्था येतील त्या त्या संस्थे मध्ये त्यांना इन्क्ल्यूड करावे.

त्या लोकांना कोणी नेता नाही ते गेले चार ते पाच वर्षापासून आपल्याकडे काम करतात. त्यावेळेस पासून आजपर्यंत ते लोक आपल्याकडे सगळया शाळामध्ये पुर्णवेळ सगळयाप्रकारचे काम आपण त्यांच्याकडून करुन घेतो. ते २००४ पासून आपल्याकडे आहेत त्यांना माणूसकीच्या दृष्टिकोनातून १५०००/- सानुग्रह अनुदान ताबडतोब दयावे. त्या ठरावाची ताबडतोब अंमलबजावणी करावी.
३) मनपा कर्मचा-याच्या बोनसबाबतचा दोन तीन दिवसात सकारात्मक निर्णय होणे अपेक्षीत आहे.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७६/२०१७
दिनांक - १६/१०/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.